RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक २३] मंगळवार, एप्रिल ७, २०२६/चैत्र १७, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

### असाधारण क्रमांक ३४

### प्राधिकृत प्रकाशन

### उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन यांजकडून

नवीन प्रशासकीय भवन श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड, दिनांक १ एप्रिल २०२६.

### अधिसूचना

क्रमांक उविअश्री/भूसंपादन/कात-६/मारळ/एसआरक्रं.१-२०२५/२०२६.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, क्रमांक संकिर्ण-क्र. उविअश्री/कात-६/भूसंपादन/मारळ/एसआरक्रं. १-२०२५/२०२५, दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले आत असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासनास असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन, उपविभाग श्रीवर्धन यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची- एक**

**संपादित अनुसूची एक**

(संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन)

गावाचे नाव - मौजे-मारळ, ता-श्रीवर्धन, जिल्हा - रायगड

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | ४३९पै | ०.२२० |
| २ | ५७५पै | ०.१८४ |
| ३ | ५७७ | ०.५३० |
| ४ | ५६८पै | ०.२८३ |
| ५ | ५७६पै | ०.२६० |
| ६ | ५८४पै | ०.०६० |
| | **एकूण** | **१.५३७** |

**अनुसूची- दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : मौजे मारळ, ता. श्रीवर्धन येथील हरीहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना प्रयोजनासाठी

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : मौजे मारळ, ता. श्रीवर्धन येथील हरीहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना प्रयोजनासाठी संपादन करण्यात येणारी जमीन मारळ हद्दीत येते. सदरची जमीन ही हरिहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना करिता संपादन करण्यात आलेल्या जमिनीलगत आहे.

**समाजाला होणारे लाभ** : हरिहरेश्वर मारळ पाणीपुरवठा योजना मधून हरिहरेश्वर तिर्थक्षेत्र/पर्यटन स्थळ व परिसरातील गावांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था/सोयी निर्माण होणार आहे.

**अनुसूची- तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

गावचे नाव मारळ, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | निरंक | |

**अनुसूची- चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**निरंक**

**टिप.—** उक्त जमिनीच्या नकाशाचे. उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन, उपविभाग श्रीवर्धन, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, श्रीवर्धन, विभाग श्रीवर्धन, यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय भवन श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड, पिन ४०२ ११० या कार्यालयात निरीक्षण करता होऊ शकेल.

श्रीवर्धन,
दिनांक १ एप्रिल २०२६.

**महेश पाटील,**
उपविभागीय अधिकारी, उपविभाग, श्रीवर्धन.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.